बिहारच्या विजयानंतर अजित पवार दिल्लीत अमित शाहांच्या भेटीला >>पान 2

आदिवासींच्या जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीचे रक्षण करा : मुख्यमंत्री फडणवीस >>पान 3

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील 'ऑन फिल्ड' : वडनेर-मलकापूर रोडवर अवैध बायोडिझेलवर छापा >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ



मी कट्टर भाजप समर्थक, मला अभिमानही वाटतो

आतील पान

**सुविचार**

जीवन एक परीक्षा आहे, संयम हे उत्तर आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 102 ■ रविवार, दि. 16 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी फडणवीस सरकारची मोठी घोषणा!



**मुंबई /प्रतिनिधी : राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी काहीशी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यात अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांच्या खरडलेल्या शेतजमिनीसाठी मोफत माती, गाळ, मुरूम आणि कंकर दिला जाणार असल्याची माहिती पुढे आली आहे. जमीनीच्या सुपीकतेसाठी महसूल मंत्र्यांनी हा मोठा निर्णय घेतलाय. पूरग्रस्त जमीनीसाठी गौण खनिजे इत्यांदींवर रॉयल्टी माफ करण्यात येणार आहे. दरम्यान, राज्य सरकारच्या या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. त्यामुळे अतिवृष्टी बाधित पूरग्रस्त शेतकऱ्यांना या निर्णयामुळे दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.**

शेतकऱ्यांना आपण जगाचा पोशिंदा, अन्नदाता म्हणतो. पण सध्या राज्यातील शेतकरी संकटात सापडलाय. अतिवृष्टी आणि पुरामुळं शेतकऱ्यांच्या घराचं, पिकांचं आणि त्याचबरोबर जमिनींचं मोठं नुकसान झालंय. सोलापूर जिल्ह्यातील सीना नदीला सप्टेंबर महिन्यात महापूर आला होता. या पुरात शेतकऱ्यांची पिकं तर वाहून गेलीच, पण जमिनी देखील वाहून गेल्या आहेत. जमिनीला १० ते १५ फुटाचे खड्डे पडलेत. नदीने पाण्याचा प्रवाहच बदलल्यानं सगळं होत्याचं नव्हतं झालं आहे. अशीच काहीशी परिस्थिती उर्वरित महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी बघायला मिळाली आहे. दरम्यान, या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मायेचा आधार देण्यासाठी आता राज्य सरकारने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

**सर्वाधिक नुकसान कुठे?**

महाराष्ट्रात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल ३० जिल्ह्यांमध्ये शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात आले आहेत. गेल्या दोन महिन्यांमध्ये राज्यात पावसाचे थैमान चालू असून, पुर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात राज्यातील १,७८५,७१४ हेक्टर (४,२८४,८४६ एकर) क्षेत्र अतिवृष्टीमुळे बाधित झाले आहे. या काळात प्रामुख्याने खरीप पिकांचे नुकसान झाले असून, सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग यासोबतच भाजीपाला, फळपिके, बाजरी, ऊस, कांदा, ज्वारी व हळद यांनाही मोठा फटका बसला आहे.

सर्वाधिक नुकसान झालेले जिल्हे नांदेड (७२८,०४९ हेक्टर), यवतमाळ (३१८,८६० हेक्टर), वाशीम (२०३,०९८ हेक्टर), धाराशिव (१५७,६१० हेक्टर), अकोला (१७७,४६६ हेक्टर), सोलापूर (४७,२६६ हेक्टर) आणि बुलढाणा (८९,७८२ हेक्टर) आहेत. राज्यातील एकूण १९५ तालुक्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून ६५४ महसूल मंडळांतील खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

## नवले ब्रीज अपघातानंतर धक्कादायक दृश्य; रस्त्यावर पडलेले पैसे-दागिन्यांचे तुकडे गोळा करणाऱ्यांचा व्हिडीओ व्हायरल, माणुसकीला काळीमा फासणारी घटना

**पुणे/प्रतिनिधी** : नवले ब्रीज परिसरात गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातानंतरचा एक धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये अपघाताच्या ठिकाणी अनेक व्यक्ती रस्त्यावर विखुरलेले पैसे किंवा सोन्यासारख्या वस्तू गोळा करताना दिसतात. यावरती नेटकरी संताप व्यक्त करत आहेत. अपघातात एका कंटेनरचे नियंत्रण सुटल्याने आठ ते दहा वाहनांना जोरदार धडक दिली. एका कारचा अक्षरश: चेंदामेंदा होऊन आग लागली आणि या भीषण दुर्घटनेत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. त्या ठिकाणी पडलेले पैसे मृतांच्या अंगावरील सोन्याच्या दागिन्यांचे तुकडे गोळा करण्याचा व्हिडीओ चांगलाच चर्चेत आला असून या वर्तनामुळे नेटकऱ्यांनीकडून संताप व्यक्त केला जात आहे. ''माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना'' असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.बंगळुरू पुणे महामार्गावर नवले पूल परिसरात गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघाताने शहर हादरलं. ही संध्याकाळ आठ निष्पाप जीवांसाठी 'काळ' ठरली. घटनास्थळी पसरलेला काळोख, वाहनांचे चेंदामेंदा झालेले अवशेष आणि जखमींच्या नातेवाइकांचा हंबरडा हे दृश्य हृदय पिळवटून टाकणारे होते. दोन कंटेनर आणि एका कारच्या झालेल्या जबरदस्त अपघातात काही क्षणांतच ८ जण जळून खाक झाले, तर तब्बल २० जण जखमी झाले. गुरुवारी (दि. १३) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कात्रज बोगद्याकडून नवले पुलाकडे येणाऱ्या महामार्गावर हा अपघात झाला. या अपघातात मृत्यू झालेल्या ८ जणांमध्ये एक ३ वर्षांच्या चिमुकलीचाही समावेश आहे.

## श्रीनगरमधील नौगाम पोलीस ठाण्यात स्फोट, ९ जणांचा मृत्यू

**श्रीनगर (जम्मू आणि काश्मीर):** दिल्लीतील दहशतवादी हल्ल्यानंतर शुक्रवारी रात्री उशिरा जम्मू आणि काश्मीरमधल्या दक्षिण श्रीनगरमधील नौगाम पोलीस ठाण्यात मोठा स्फोट झालाय. हा स्फोट इतका भयंकर होता की, त्याच्या आवाजानं संपूर्ण परिसर हादरून गेला. मिळालेल्या माहितीनुसार, स्फोटामुळे पोलीस ठाण्याचा एक भाग कोसळला आणि घटनास्थळी असलेल्या अनेक वाहनांचेही नुकसान झाले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, अलिकडच्या ''व्हाईट कॉलर'' दहशतवादी मॉड्यूल प्रकरणासंदर्भात जप्त केलेल्या स्फोटकांच्या मोठ्या साठ्यातून अधिकारी नमुने घेत असताना हा स्फोट झालाय.

नौगाम पोलीस ठाण्याजवळ झालेल्या स्फोटाबद्दल निवेदन जारी : जम्मू आणि काश्मीरचे पोलीस महासंचालक नलिन प्रभात यांनी नौगाम पोलीस ठाण्याजवळ झालेल्या स्फोटाबद्दल निवेदन जारी केलंय. त्यांनी सांगितले की, नौगाम पोलीस ठाण्याच्या एफआयआर क्रमांक १६२/२०२५ च्या तपासादरम्यान ९ आणि १० नोव्हेंबर २०२५ रोजी फरिदाबाद येथून मोठ्या प्रमाणात स्फोटके, रसायने जप्त करण्यात आले. इतर जप्तींप्रमाणेच या जप्तीतून ताब्यात घेतलेली स्फोटके नौगाम पोलीस ठाण्याच्या मोकळ्या जागेत सुरक्षितपणे नेण्यात आलंय. जप्तीतील नमुने पुढील फॉरेन्सिक आणि रासायनिक तपासणीसाठी पाठवण्यात येणार होते. गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात स्फोटकांचा साठा जप्त करण्याची प्रक्रिया एफएसएल टीमकडून सुरू होती.

स्फोटात नऊ जणांना आपला जीव गमवावा लागला : जप्तीच्या अस्थिर आणि संवेदनशील



स्वरूपामुळे एफएसएल टीमकडून नमुने घेण्याची प्रक्रिया आणि हाताळणी अत्यंत काळजीपूर्वक केली जात होती. दुर्दैवाने या काळात काल रात्री ११.२० वाजताच्या सुमारास अपघाती स्फोट झालाय. या घटनेच्या कारणाबद्दल अधिक अंदाज लावणे अनावश्यक आहे. या घटनेत नऊ जणांना आपला जीव गमवावा लागला. एसआयएचा एक कर्मचारी, एफएसएल टीमचे तीन कर्मचारी, दोन छायाचित्रकार, दंडाधिकारी टीममधील दोन महसूल अधिकारी आणि टीमशी संबंधित एक शिंपी जखमी झाले. याशिवाय २७ पोलीस, दोन महसूल अधिकारी आणि आजूबाजूच्या परिसरातील तीन नागरिक जखमी झाले आणि त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलेत. पोलीस ठाण्याच्या इमारतीचे मोठे नुकसान झाले आणि आजूबाजूच्या इमारतींनाही याचा फटका बसला. नुकसान किती झाले याचा शोध घेतला जात आहे. या दुर्दैवी घटनेचे कारण तपासले जात आहे. या दुःखाच्या वेळी जम्मू आणि काश्मीर पोलीस मृतांच्या कुटुंबीयांसोबत उभे आहेत.

## रुग्णवाहिकेपाठोपाठ आता शाळकरी मुलांच्या वाहनांना ट्रॅफिकमधून रस्ता द्यावा लागणार

**दैनिक आपला विदर्भ**

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण-डोंबिवली शहर स्मार्ट सिटी म्हणून विकसित होत आहे. या होणाऱ्या विकास कामांमुळे शहरात दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते,याचा मुख्य फटका केडीएमसी महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या बसगाड्यांना होत आहे. परिणामी शाळेत उशीरा पोहोचणे किंवा त्यांचा आरोग्य आणि अभ्यासावरही परिणाम होत आहे. मात्र या समस्येतून सुटण्यासाठी शाळा व्यवस्थापन आणि पालकांनी महापालिकेकडे एक मागणी केलेली आहे.

शिक्षण विभागाच्या आकडेवारीनुसार कल्याण-डोंबिवलीत ३०० पेक्षा जास्त शाळा आहेत, ज्यामध्ये सरकारी तसेच खासगी शाळा दोन्हींचा समावेश आहे. या शाळांमधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दररोज विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी रिक्षा किंवा सहा आसनी कार तसेच बसचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. अनेक विद्यार्थ्यांची शाळा सकाळी ८ वाजता सुरू होते. त्यामुळे त्यांना साडेसहा ते सात वाजताच बस पकडावी लागते पण वाहतूक कोंडीमुळे बस वेळेवर पोहोचत नाही.

शाळेच्या बसगाड्यांवर सायरन बसवल्यास आणि त्यांना स्वतंत्र मार्गिका मिळाल्यास किंवा वाहतूक पोलिसांनी प्राधान्य दिल्यास विद्यार्थी वेळेत शाळेत पोहोचू शकतील. एवढेच नाही



तर रुग्णवाहिकांना जसे वाहतूक पोलिस वाट मोकळी करून देतात तसंच शाळेच्या बसगाड्यांना देखील प्राधान्य दिले जाणे गरजेचे आहे, असे शाळा व्यवस्थापन आणि पालकांनी म्हटले आहे.

महापालिका क्षेत्रात होणाऱ्या वाहतूक कोंडीचे मुख्य कारण म्हणजे मेट्रो काम, पुलाचे काम आणि काही मार्गांवर वाहतूकीत केलेला बदल. कल्याण-मुरबाड मार्गावर विविध शाळा आहेत तसेच कांबा, वरप, म्हारळ या ठिकाणी म ोठ्या इंग्रजी माध्यम शाळा आहेत. शहाड पुलाचे काम आणि गोविंदवाडी बायपास २ रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. कल्याण काटेमानिवली, प्रल्हाद शिंदे उड्डाणपूल आणि निळजे पुलावरही वाहतूक त्रासदायक आहे.

## काँग्रेसचा मोठा निर्णय! मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढणार; रमेश चेन्नितला यांची घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईत महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसनं एकला चलो रेचा मोठा नारा दिला आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर लढणार असल्याची घोषणा काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नितला यांनी केली.

काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी स्वबळावर लढण्याची मागणी केली असून, २२७ जागांवर पक्षानं स्वतःच्या उमेदवारांना संधी द्यावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. ही निवडणूक स्थानिक पातळीवरील असून, स्थानिक नेत्यांच्या भावना आणि कार्यकर्त्यांच्या इच्छेला महत्व द्यायला हवं, असं रमेश चेन्नितला यांनी काँग्रेसच्या एकदिवसीय शिबिरामध्ये स्पष्ट केलं.

आगामी महापालिका निवडणूक स्थानिक पातळीवरची असल्यामुळं स्थानिक स्तरावर कार्यरत नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना उमेदवारीची संधी द्यावी, असं पक्षाचं मत आहे. मात्र, मुंबईमधील आणि इतर जिल्ह्यातील आघाडीबाबतचे निर्णय वेगवेगळे घेतले जाऊ शकतात, कारण प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकारी आणि स्थानिक संघटनांनी या विषयावर चर्चा सुरू केली असून, त्याप्रमाणं त्या-त्या जिल्ह्यात निर्णय घेतले जातील. पक्षाकडून नेहमीच पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मताला महत्व दिलं जातं. तसंच पक्षश्रेष्ठींच्या निर्देशानुसार मुंबईमध्ये आघाडी केली जाऊ नये,'' असा निर्णय घेतल्याचं चेन्नितला यांनी स्पष्ट केलं.

याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ता आणि युवक मुंबई अध्यक्ष ॲड. अमोल मातेले यांनी कानपिचक्या देत बिहारच्या पराभवावरून काँग्रेसनं धडा घ्यावा आणि मुंबई महानगरपालिकेत आडमुठेपणा न करता इंडिया आघाडी म्हणून एकत्र लढावं, असं म्हटलं. ''मुंबई महानगरपालिकेच्या ९० हजार कोटीच्या एफडीमधील सुमारे १२ हजार कोटी रुपये मुंबईत प्रशासनानं



फक्त रस्त्याच्या कामासाठी खर्च केले असून जनतेच्या पैशाची ही उधळणूक रोखायची असेल तर भाजपाला रोखणं गरजेचं आहे. त्यामुळं शिवसेना (उबाठा), मनसे, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांच्यासह सर्व समविचारी पक्षांनी मुंबई महानारपालिका निवडणूक एकत्र येत लढली पाहिजे,'' असं मातेले यांनी सांगितलं.'निवडणुका आल्या की लोकप्रिय योजनांची घोषणा करायची. सरकारी योजनांच्या नावाखाली आचारसंहितेमध्ये महिलांना पैसे वाटप करायचे ही मत विकत घेण्याची नवी पद्धत भाजपानं सुरु केली आहे





## बिहारमध्ये एडीएला बहुमत कसे मिळाले? महाआघाडीचा पराभव का झाला?

### शरद पवारांनी केले निवडणुकीचे विश्लेषण

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : बिहार विधानसभेच्या निवडणुकीत एनडीएने मोठा विजय मिळवत तब्बल २०२ जागा जिंकल्या आहेत. तर विरोधकांच्या महाआघाडीला फक्त ३५ जागांवरच समाधान मानावं लागलं. त्यामुळे बिहारच्या निवडणुकीत महाआघाडीला मोठा धक्का बसला. दरम्यान, बिहार निवडणुकीच्या निकालावर राजकीय नेते मंडळी प्रतिक्रिया देत आहेत. या संदर्भात आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया देत बिहार निवडणुकीच्या निकालाचं थेट विश्लेषण केलं आहे.

बिहारमध्ये एनडीएला एवढ्या मोठ्या प्रमाणात बहुमत कसं मिळालं? त्यामागील कारणं काय आहेत? तसेच बिहारच्या निवडणुकीत विरोधकांच्या म हाआघाडीचा पराभव का झाला? त्यामागील कारणं काय आहेत? याबाबत शरद पवारांनी माध्यम ांशी बोलताना सविस्तर भूमिका मांडली. बिहारमध्ये एनडीएच्या एवढ्या जागा जिंकून येण्याम ागचं कारण तेथील महिलांना त्यांच्या खात्यात १० हजार रुपये देण्याच्या योजनेचा हा परिणाम असल्याचं शरद पवारांनी म्हटलं आहे.

**शरद पवार काय म्हणाले?**

बिहारच्या निवडणुकीचं विश्लेषण कसं कराल? असा प्रश्न पत्रकारांनी शरद पवारांना विचारला. त्यावर उत्तर देताना शरद पवार म्हणाले की, ''बिहारच्या निवडणुकीचं म तदान झालं. त्यानंतर मी काही लोकांशी बोललो. त्यांच्याकडून मला अशी माहिती मिळाली की बिहारच्या निवडणुकीत मतदान महिलांनी हातामध्ये घेतलं होतं. एक अशी शंका होती, ज्या अर्थी महिलांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदानात सहभाग घेतला, याचा अर्थ महिलांना त्यांच्या खात्यात १० हजार रुपये देण्याच्या योजनेचा हा परिणाम असावा'', असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

**'निवडणूक आयोगानेही गांभीर्याने विचार करावाष्ठ'**

''महाराष्ट्रात देखील



निवडणुकीच्या आधी अधिकृत पैसे वाटले, म्हणजे प्रत्येक मताला पैसे देतात तसे नाही, तर सरकारच्यावतीने योजनेच्या माध्यमातून पैसे दिले, म्हणजे लाडकी बहीण योजना. आता प्रश्न असा आहे की यापुढील निवडणुकीत ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांनी मतदानाच्या आधी अशा प्रकारे पैशांचं वाटप करून निवडणुकीला सामोरं जाण्याची भूमिका घेतली तर निवडणुकीच्या प्रक्रियेवरील लोकांच्या विश्वासाला धक्का बसेल. एवढ्या मोठ्या प्रमाणात पैशांचं वाटप करणं हे योग्य आहे का? याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. निवडणूक आयोगानेही गांभीर्याने याचा विचार केला पाहिजे. निवडणुका स्वच्छ आणि पारदर्शक पद्धतीने झाल्या पाहिजेत'', असं शरद पवारांनी म्हटलं आहे.

## सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या (सिंगल युज) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत. निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.

# बिहारच्या विजयानंतर अजित पवार दिल्लीत अमित शाहांच्या भेटीला

## दोन्ही नेत्यांमधे २५ मिनटं चर्चा; भेटीमुळे राजकीय चर्चेला उधाण!

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई : बिहारमध्ये मतदारांच्या कौल जवळ जवळ निश्रि्चत झाला आहे. बिहारमध्ये नीतीश-मोदी-चिरागच्या एनडीएची त्सुनामी आली. २४३ पैकी २०३ जागा एनडीएनं जिंकल्या आहेत. राजद आणि काँग्रेसचं गठबंधन अक्षरश: वाहून गेलं. बिहारच्या जनतेनं, विशेषत: बिहारमधील महिला मतदारांनी एनडीएच्या पारड्यात मतांचं भरभरुन दान टाकलंय. या साऱ्या ऐतिहासिक विजयामुळे राज्यातील सत्ताधारी महायुतीचा विश्र्वास दुणावला असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे या विजयोत्सवानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली आहे. अमित शाह यांच्या निवासस्थानी जात अजित पवारांनी बिहार विधानसभा निवडणुकीच्या यशाबद्दल अभिनंदन केल्याची माहिती आहे.

मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अमित शाहांच्या भेटीमुळे अनेक राजकीय तर्क वितर्क लावले जात आहे. या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये राज्यातील काही महत्वाच्या विषयांवर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडे पार्थ पवार यांच्या पुण्यातील जामीन घोटाळा आरोप प्रकरणाच्या पार्श्र्वभूमीवर या भेटीला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. शुक्रवारी रात्री दोन्ही नेत्यांमधे जवळपास २५ मिनिट चर्चा झाली आहे. या भेटीतील चर्चेचा तपशील जरी कळू शकलेला नसला तरी या भेटीमुळे अनके राजकीय चर्चा रंगू लागल्या आहेत.

दुसरीकडे, पुण्यातील वादग्रस्त जमिनीच्या खरेदी व्यवहारावर गैरप्रकाराचे आरोप झाल्यानंतर पार्थ पवारांच्या अमेडिया कंपनी प्रकरणाचा अहवाल सोमवारी सादर होणार आहे. दस्त नोंदणी पातळीवरील अनियमितता तपासण्यासाठी प्रभारी नोंदणी महानिरीक्षकांनी नेमलेल्या समितीचा अहवाल सोमवारी सादर होणार आहे. अहवालाबाबत अंतिम कामकाज सोमवारपर्यंत पूर्ण होऊन अहवाल सादर करण्यात येईल, नोंदणी विभागाकडून नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाची माहिती समोर आली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया



कंपनीचे भागधारक दिग्विजयसिंह पाटील आणि पावर ऑफ अटॉर्नी शीतल तेजवानी यांच्यात ३०० कोटी रुपयांमध्ये हा व्यवहार झाला होता. मात्र, ही जमीन सरकारी असल्याने हा व्यवहार बेकायदा असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर याप्रकरणी सहदुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना निलंबित केलं होतं आणि त्यांच्यावर गुन्हादेखील दाखल केला. या संपूर्ण प्रकरणाची तपासणी करण्यासाठी चार सदस्यिय समिती नेमली होती. त्याचा अहवाल सोमवारी सादर होणार आहे.

# शरद पवारांचं स्थानिक नेत्यांना सरप्राइज, आगामी निवडणुकीसाठी दिलं मोकळं रान

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुका अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. पण अद्याप महाविकास आघाडी किंवा महायुतीकडून निवडणुका कशा लढायच्या? हे निश्चित झालं नाही. अनेक ठिकाणी युती आणि आघाडीमध्ये धुसफूस सुरू असून स्वबळावर निवडणूक लढण्याची घोषणा करण्यात आली आहे. असं असताना आता शरद पवारांकडून कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना म ोकळं रान दिलं आहे.

स्थानिक पातळीवर युती आघाडी करायला कोणतीही अट नाही. युती आघाडी कुणाशी करायची, हा निर्णय स्थानिक पातळीवर घ्यावा, असं पवारांनी म्हटलं आहे. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर महाविकास आघाडी एकत्र लढणार का? याबाबत प्रश्न विचारला असता शरद पवार म्हणाले, ''स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत म तदार पक्ष म्हणून मतदान करत नसतो. याआधीच्या निवडणुका आम्ही पार्टी



म्हणून निवडणुका लढलो. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या वतीने आम्ही सांगितलं आहे, की त्या-त्या तालुक्यात किंवा जिल्ह्यात पक्षाच्या सहकाऱ्यांनी स्थानिक स्थिती बघून निर्णय घ्यावा.. हा निकाल त्यांचा असेल.''

मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसने स्वबळाचा नारा दिल्याबद्दल विचारलं असता शरद पवार म्हणाले, ''काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेणार की नाही, हे मला म ाहीत नाही. पण त्यांनी तसा निर्णय घेतला तरी त्यात काही आश्चर्य नाही. स्पष्ट सांगायचं म्हणजे अजून मुंबई महापालिकेच्या निवडणुका जाहीर झाल्या नाहीत.''

यावेळी पवारांनी बिहार निवडणूक निकालावर देखील भाष्य केलं. ''या निवडणुकीचे मतदान झाल्यानंतर मी काही लोकांशी बोललो. त्यांच्याकडून मला फिडबॅक असा आला की, या निवडणुकीचं मतदान महिलांनी हातात घेतलं. महिलांच्या खात्यावर १० हजार आले, त्याचा हा परिणाम असावा असं वाटतं. महाराष्ट्रातसुद्धा निवडणुकीच्या आधी पैसे वाटले. लाडक्या बहिणीच्या योजनेतून अधिकृतरित्या पैसे वाटले. तसंच या वेळीही झालं. इथून पुढे ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांनी म तदानाआधी अशा प्रकारे पैशांचं वाटप करुन निवडणुकीला सामोरं जायचं, ही भूमिका घेतली तर निवडणूक पद्धतीवरचा लोकांचा विश्वास उडेल. निवडणूक आयोगानेसुद्धा याचा विचार केला पाहिजे. निवडणूक ही स्वच्छ आणि पारदर्शक व्हावी, याकडे लक्ष दिलं पाहिजे. १० हजार रुपये ही काय लहान रक्कम नाही. ५० टक्क्यांहून अधिक महिलांचं मतदान आहे. सत्तेत असलेल्यांनी अधिकृतपणे पैसे वाटणं हे चिंताजनक आहे, असंही शरद पवार म्हणाले.

## बिहार निकालानंतर सगळ्या आरोपांचं उत्तर विरोधकांना मिळालं, मंत्री प्रकाश आबिटकरांची विरोधकांवर टीका

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** : बिहारच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएनं मोठं यश मिळवलं. यानंतर विरोधकांनी पुन्हा एकदा निवडणुकीच्या प्रक्रियेवर टीका केली आहे. विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देत राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर शनिवारी अहिल्यानगरच्या दौऱ्यावर होते, यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी आपली प्रतिक्रिया दिली.

महाराष्ट्राचा निकाल लागल्यानंतर ज्या पद्धतीनं आरोप-प्रत्यारोप होत होते, त्याचं उत्तर शुक्रवारी झालेल्या बिहार निवडणुकीच्या निकालातून विरोधकांना मिळालं. जनतेच्या मनात जो निर्णय असतो तोच अंतिम ठरतो. मतचोरी, ईव्हीएम मशीन यापेक्षा जनतेला जे वाटते तेच होतं, असं म्हणत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विरोधकांवर टीका केली.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शनिवारी शिर्डीत साईबाबांच्या समाधीचं मनोभावे दर्शन घेतलं. साई दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, ''शिर्डीला आल्यानंतर साईबाबांचं दर्शन आणि आशीर्वाद घेण्याची सर्वांची भावना असते. आज शिर्डी दौऱ्यावर असल्यानं दौऱ्याला सुरुवात करण्याआधी मी साईबाबांच्या मंदिरात येऊन दर्शन घेतलं. साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेऊन महाराष्ट्रातील जनतेच्या समृद्धी आणि आरोग्यासाठी प्रार्थना केली आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला मोठं यश मिळालं. महाराष्ट्रात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही महायुतीला अशाच पद्धतीचं यश मिळेल, असा विश्वास मंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला.

बिहार निवडणुकीत एनडीएला मिळालेल्या यशानंतर खासदार संजय राऊत यांनी टीका करत महाराष्ट्रातील पॅटर्न बिहार निवडणुकीत वापरला गेला असं म्हटलं होतं, याला उत्तर देताना मंत्री आबिटकर म्हणाले, महाराष्ट्रात ज्या पद्धतीची लँडस्लाईड व्हिक्टरी मिळाली, त्यानंतर काहींनी ईव्हीएममध्ये दोष आहे, मतचोरी झाली, अशा विविध प्रकारचे आरोप केले होते. कालच्या बिहार निवडणुकीच्या निकालानंतर या सगळ्या आरोपांचे उत्तर संजय राऊत यांना मिळालं आहे.

# थंडीचा जोर वाढल्याने 'हुडहुडी' भरणार

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला राज्याच्या अनेक भागांत झालेल्या पावसानंतर, आता महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या वातावरणात मोठा बदल झाला आहे. ज्याची मुंबईकर आतुरतेने वाट पाहत होते, त्या थंडीचे अखेर आगमन होताना दिसत आहे. नेहमी उष्णतेच्या धारांनी त्रस्त असलेल्या मुंबईत आता थंडीची चाहूल लागली आहे. येथील किमान तापमान २० अंशांपर्यंत खाली आले आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, येत्या दोन दिवसांत मुंबईतील तापमान आणखी घसरून १८ओउ ते १९ओउ राहण्याची शक्यता आहे. यामुळे मुंबईकरांना त्यांचे स्वेटर आणि जॅकेट बाहेर काढून थंडीचा आनंद लुटता येणार आहे. फक्त मुंबईतच नव्हे, तर राज्यातील विविध भागांतही थंडीचा कडाका कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यातील बहुसंख्य शहरांमध्ये तापमानाचा पारा घसरत असून, येते दोन ते तीन दिवस सोमवारपर्यंत हा गारठा टिकून राहणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. थंडी वाढल्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

राज्यात आता थंडीचा कडाका अधिक वाढणार असून, हवामानामध्ये मोठा बदल झाला आहे. राज्याच्या कमाल तापमानात हळूहळू घट होत आहे. उत्तरेकडील शीतल वाऱ्यांचे प्रवाह आता थेट महाराष्ट्राकडे झेपावत असल्यामुळे ही थंडी वाढली आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्रात आलेली ही थंडीची लाट काही दिवस टिकून राहणार आहे. राज्यातही मोठ्या प्रमाणात गारठा वाढणार असून, हवामान विभागाने अनेक ठिकाणी थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे. यामुळे कमाल तापमानातही घट नोंदवली जात आहे. या थंडीच्या प्रभावामुळे मुंबईच्या तापमानात लक्षणीय घट झाली आहे. शुक्रवारी मुंबईचे किमान तापमान २०ओउ (२० अंशांच्या) खाली जाऊन १८.४ओउ (१८.४ अंश सेल्सिअस) नोंदवण्यात आले. हेच वातावरण पुढील २ ते ३ दिवस कायम राहणार आहे. शनिवार आणि रविवार तसेच सोमवारपर्यंतही ही थंडी टिकून राहील. येत्या २ ते ३ दिवसांत थंडीचा पारा आणखी खाली घसरून १६ओउ ते १७ओउ वर उतरण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील दोन आठवड्यांसाठी महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे, १४ ते २० नोव्हेंबर आणि २१ ते २७ नोव्हेंबर या दोन आठवड्यांदरम्यान



महाराष्ट्र व मध्य भारतातील बहुतेक भागात किमान तापमान सामान्यपेक्षा कमी राहू शकते. थंडीचा कडाका वाढणार असल्याने नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उत्तर महाराष्ट्रातील प्रमुख शहर असलेल्या नाशिकमध्ये सध्या थंडीचा कडाका कायम आहे. येथील किमान तापमान सातत्याने खाली घसरल्याने शहर पूर्णपणे गारठले आहे. गेल्या आठवड्याभरापासून शहराचे तापमान १०ओउ आसपास स्थिर आहे. या तीव्र थंडीमुळे नाशिककरांना दिवसाही गारठल्यासारखे वाटत आहे. वाढत्या थंडीमुळे शहरात सर्वत्र धुक पसरले होते. विशेषतः गोदावरी नदीवर धुक्याची चादर पसरल्याचे विहंगम दृश्य बघायला मिळाले. हवामान विभागाने नाशिककरांसाठी आणखी थंडी वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. पुढच्या आठवड्यात नाशिकमध्ये थंडीचा कडाका आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे किमान तापमान १०ओउ च्या खाली जाण्याची शक्यता आहे. नागरिकांनी या वाढलेल्या थंडीत आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. मुंबईत थंडीची चाहूल लागल्याने किमान तापमानाचा पारा घसरला असला तरी, या हवामान बदलाचा हवेच्या गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम झाला आहे. मुंबईतील हवामानाने पुन्हा एकदा चिंता वाढवली असून, हवेची गुणवत्ता पुन्हा ढासळली आहे. मुंबईतील एक्युआय आता १८७ वर पोहोचला असून, तो 'धोकादायक' श्रेणीत गणला जातो. यामुळे मुंबईत आता पुन्हा धूरकट वातावरण तयार झाले आहे. विशेष म्हणजे, दिवसा थंडी असूनही दुपारच्या वेळी उकाडाही वाढल्याचे जाणवत आहे. जगातील प्रदूषणग्रस्त शहरांच्या यादीत मुंबई सध्या ५२ व्या क्रमांकावर आहे. हवेतील प्रदूषक कणांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. हवेतील पीएम २.५ (सूक्ष्म कण) चे प्रमाण १०८ वर पोहोचले आहे.

पीएम १० चे प्रमाण १३८ वर पोहोचले असून, या दोन्ही कणांच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. हवेची गुणवत्ता ढासळण्यामागे मुंबईत मोठ्या प्रमाणात सुरू असलेली विकासकामे आणि इमारतींच्या बांधकामात झालेली वाढ हे प्रमुख कारण आहे. या कामांमुळे धूलिकण हवेत मोठ्या प्रमाणात मिसळले आहेत. हवेच्या या ढासळलेल्या गुणवत्तेमुळे मुंबईकरांना श्र्वसनाचे आजार मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या वाढत्या वायुप्रदूषणावर मुंबई महापालिका आणि महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे लक्ष आहे आणि त्यांच्याकडून उपाययोजना अपेक्षित आहेत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# आदिवासींच्या जल, जंगल, जमीन आणि संस्कृतीचे रक्षण करू : मुख्यमंत्री फडणवीस

## राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी** : राज्य शासन प्रत्येक आदिवासींना वन जमीन पट्टा देत आहे व त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करीत आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी राज्य शासन आदिवासी विकास विभागाच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. जनजाती वर्षाच्या निमित्ताने राज्य शासन भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आदिवासींच्या जल, जंगल आणि जमीन व संस्कृतीचे रक्षण करेल, असा विश्र्वास आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त व जनजातीय गौरव वर्षांतर्गत येथील मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे १५ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. आज या महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके, विभागाचे




राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश कुमार, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यंदाचे वर्ष 'जनजातीय वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील आदिवासी जननायकांचे चरित्र जनतेसमोर आणण्याचे तसेच त्यांचे स्मारके उभारण्याचा कार्यक्रम दिला आहे. राज्य शासनानेही राज्यातील आदिवासी नायकांचा गौरवशाली इतिहास पुस्तकरूपाने जनतेसमोर आणला आहे. विविध योजनांद्वारे आदिवासी समाजाचा विकास साधण्यात येत आहे. राज्यातील आदिवासी आश्रम शाळांचा दर्जा सुधारला आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी 'स्वयम् योजना' राबविण्यात येत आहे. एकही आदिवासी मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राणी दुर्गावती सक्षमीकरण योजनेद्वारे दीड लाख आदिवासी महिलांना पन्नास हजार ते दीड लाखांपर्यंत मदत करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात आदिवासी समाजाच्या विकासासाठी 'धरती आबा कार्यक्रम' देशभर राबविण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात 'धरती आबा कार्यक्रम' राबविण्यासाठी १७ मंत्रालयांच्या २५ योजना एकत्र करून ३२ जिल्ह्यातील पाच हजार गावांतील प्रत्येक आदिवासी पाड्यांवर रस्ते, पाणी, वीज, रोजगार आणि महिला विकासाच्या योजना पोहाचविल्या जात आहेत. आश्रमशाळांचे डिजिटायजेशन झाले आहे. ३७ एकलव्य शाळांतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

**आदिवासींच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प करूया - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

देशाच्या विकासात आदिवासी समाजाचे मोठे योगदान आहे. भगवान बिरसा मुंडा हे या समाजाच्या अभिमान व स्वाभिमानाचे प्रतिक आहेत. निसर्गाच्या सानिध्यात राहून आपली समृद्ध परंपरा जपण्याचे कार्य हा समाज करीत असून त्यांच्या सर्वांगिक विकासाठी संकल्प करण्याचे आवाहन यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. जंगलात राहत असल्याने व शहरी भागापासून दूर असल्याने त्यांच्या विकासासाठी काम होणे गरजेचे आहे. आदिवासींना योग्य संधी मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच हस्तउद्योग, कुटीर उद्योग आदींच्या माध्यमातून व आदिवासी विकासाच्या विविध योजना केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येत आहेत. आदिवासींच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकाससाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्नरत आहे. त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी आर्थिक विकासाचे मॉडेल आखून शासन कार्य करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले की, एप्रिल महिन्यापासून भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीच्या पार्श्र्वभूमीवर आदिवासी विकास विभागाच्यावतीने भगवान बिरसा सांस्कृतिक मंचाची स्थापना केली. याद्वारे ४० हजार युवा-युवतींची नोंदणी व विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. जनजातीय गौरव वर्षांतर्गत करण्यात आलेल्या विविध आयोजनांची त्यांना माहिती दिली. राणी दुर्गावती योजनेच्या माध्यमातून आदिवासी महिला लखपती दीदी होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाइन भूमिपूजन व लोकार्पण**

सुराबर्डी, नागपूर येथील गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण उपकेंद्राचे भूमिपूजन, शासकीय आश्रमशाळा, घानवळ, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जि. पालघर येथील इमारतीचे लोकार्पण, शासकीय आश्रमशाळा पळसुंडा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जि. पालघर येथील प्रयोगशाळा इमारतीचे लोकार्पण. शासकीय आश्रमशाळा, देवगाव, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक येथील संकुलात मुलींच्या वसतिगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले.

आदिवासी विभागाच्यावतीने आयोजित विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरवही त्यांच्या हस्ते करण्यात आला.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री यांच्या हस्ते 'भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रमय पुस्तका'चे आणि 'आदिवासी परंपरा व सर्जनशिलता' यावर आधारित कॉफीटेबल बुकचे प्रकाशन झाले. आमदार सर्वश्री रविंद्र चव्हाण, डॉ. आशिष देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांचीही यावेळी उपस्थिती होती.

## शॉर्ट सर्किटमुळं घराला आग, एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू

**बिहार (मुझफ्फरपूर)** : बिहारमधील मुझफ्फरपूर जिल्ह्यातील मोतीपूर पोलीस स्टेशन परिसरातील वॉर्ड क्रमांक १३ मधे शुक्रवारी रात्री उशिरा भीषण आग लागली. आगीत एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला असून सातजण जखमी झाले आहेत. ही घटना इतकी भीषण होती की, संपूर्ण घर आगीत जळून खाक झालं आहे. गावकऱ्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला, परंतु तोपर्यंत कुटुंबातील अनेक सदस्य आगीत होरपळून गेले होते. आग वेगाने पसरल्याने जवळपासच्या घरांनाही धोका निर्माण झाला.

एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू : मृतांमध्ये लालन कुमार (३५), त्यांची पत्नी पूजा कुमारी (३०), आई सुशीला देवी (६५), मुलगा गोलू कुमार (२) आणि मुलगी सृष्टी कुमारी (७) यांचा समावेश आहे. ही घटना गेना शाह यांच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावर घडली. जखमींमध्ये काका लाल बाबू प्रसाद, त्यांची पत्नी माला देवी, साक्षी कुमारी, अर्जुन कुमार, ऋषभ कुमार आणि अमन कुमार यांचा समावेश आहे, त्यापैकी चौघांची प्रकृती गंभीर आहे.

विशेष पथक तयार : जखमींवर एसकेएमसीएच रुग्णालयात उपचार सुरू आहेत. माहिती मिळताच मोतीपूर पोलीस स्टेशन आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले आहे. घटनेतील मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. डीएसपी वेस्टर्न सुचित्रा कुमारी यांनी सांगितलं की, प्राथमिक तपासात शॉर्ट सर्किटमुळं आग लागल्याचं दिसून आलं आहे.

# मी कट्टर भाजप समर्थक, मला अभिमानही वाटतो

## अभिनेत्री निवेदिता सराफ यांची स्तुतीसुमने

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : ठाण्याच्या गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात आलेल्या बालदिन विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता सराफ यांना त्यांच्या पती आणि ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या हस्ते गंधार गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या विशेष क्षणी भावना व्यक्त करताना निवेदिता सराफ यांनी स्वत:ला भाजपची कट्टर समर्थक असल्याचे जाहीरपणे सांगितले. काही दिवसांपूर्वीच दिग्गज अभिनेते महेश कोठारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपची उघडपणे प्रशंसा केल्यानंतर, आणखी एका अनुभवी कलाकाराकडून असा राजकीय कल जाहीर केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.


मंचावरून बोलताना त्या म्हणाल्या, ''आज मंचावर उपस्थित असलेल्या सर्व मान्यवर नेत्यांचे आभार. आमदार संजय केळकर यांचे विशेष अभिनंदन बिहारबद्दल.. . मी थोडी 'कट्टर बीजेपी' असल्याने आजूबाजूला एवढे सगळे पाहून मला फार अभिमान वाटतो.'' यावेळी मंगेश देसाई, विजय पाटकर आणि इतर मान्यवरांची त्यांनी कृतज्ञतापूर्वक आठवण केली.

त्या म्हणाल्या, आज जी मी काही आहे ते माझे गुरु ,पती यांच्यामुळे आहे. आज त्यांच्या हस्ते मला पुरस्कार दिला. याचा विशेष आनंद. आमदार संजय केळकर यांचे बिहार विजयासाठी अभिनंदन. मी कट्टर बीजेपी असल्याने मला खूप आनंद झाला. माझ्या आयुष्यात अभिनयाची सुरुवात बालरंगभूमी पासून झाली. सुधा करमरकर माझ्या गुरु . त्यांच्या संस्थेत अनेक बाल नाट्य केलं. मला स्टेजवर उभे राहायला कोणी शिकवले तर ते सुधाताई यांनी. त्या काळात रत्नाकर मतकरी ,सुधाताई हे त्याकाळात सातत्याने बालनाट्य करत. महाराष्ट्रभर दौरे करत.

बालनाट्य करणे कठीण पण काळाची गरज आहे. बालनाट्यात आपण उद्याचे चांगले प्रेक्षक घडवत असतो. नाटक कसे बघितले पाहिजे याचे प्रशिक्षण दिले जाते. चांगले प्रेक्षक बनतात. सभा धीटपणा येतो. त्यामुळे बालनाट्य शिबिरे घेतली पाहिजे.माझी वाटचाल बाल रंगभूमी पासून झाल्यामुळे मला हा माहेरचा पुरस्कार मिळाला आहे असे वाटत आहे.

आपल्या सुरुवातीच्या काळाविषयी बोलताना निवेदिता म्हणाल्या, ''माझा अभिनय प्रवास बालनाट्यापासून सुरू झाला. सुधा करमरकर यांनी आम्हाला स्टेजवर आत्मविश्वासाने उभं राहायला शिकवलं. नाटक कसं पाहायचं, त्याचं महत्त्व काय हे सगळं त्यांनी आम्हाला बालपणीच दिलं.'' त्यांनी पुढे सांगितलं की प्रत्येक मुलगा क्रिकेट शिकला म्हणून सचिन तेंडुलकर बनत नाही, आणि गाणं शिकून सर्वजण सोनू निगम होत नाहीत; परंतु त्यांच्यात चांगल्या





श्रोत्यांची, प्रेक्षकांची जडणघडण होते आणि व्यक्तिमत्त्व विकासास हातभार लागतो.

''कुणास ठाऊक, कदाचित मी आणि अशोक कधीतरी बालनाट्यही करू. खरं तर नाटक आपण घरी रोजच करतो, म्हणून आता बालनाट्य करण्याचा विचार आला,'' असे म्हणताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. पुरस्कार स्वीकारताना त्या भावूक झाल्या आणि म्हणाल्या, ''हा पुरस्कार मला माहेरचा वाटतोय, पण तो माझ्या पतीच्या हस्ते मिळाल्याने सासरकडून मिळाल्यासारखंही वाटतंय. आमचा संसार ३७-३८ वर्षांचा आहे. मी जिथे जन्मले त्यापेक्षा जास्त काळ मी सासरी सुखाने घालवला. त्यामुळे दोन्ही घरांचा सुंदर मिलाफ माझ्या आयुष्यात आहे. कारण आपल्या समाजात लग्न हे फक्त दोन व्यक्तींमध्ये नसतं. ते दोन कुटुंबांच्या एकत्र येण्याचं नातं असतं.'' असंही त्या म्हणाल्या.


## शब्दकोडे क्र. 10

आडवे शब्द

१. पोलिस ६. आत्याचा मुलगा ९. वजनदार १०. फळातील द्रव ११. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा १५. क्रिकेटमधील धाव १६. प्रतिबंध, विरोध १८. तमाशा १९. तोंडाचा एक भाग २१. रम्य २२. वेडावाकडा २४. मातीचा कण २५. चर्चा २७. भारतात वास्तव्य करणारे तिबेटी धर्मगुरु २८. शेतकरी (हिंदी) ३०. हाडांचा सापळा ३२. प्रत्येक दिवशी ३४. धमकी, श्वास ३६. व्रत, नियम ३८. चेहरा ४०. रामाच्या चरित्रावरील नाट्यप्रयोग ४२. शंकर ४४. मृत्यूनंतर शरीराचे केलेले दान ४६. नवरसातील एक रस ४७. विनंती ४९. आनंद ५०. ट्रीपला मराठी शब्द ५२. अजगर ५३. काळ्या तोंडाचे माकड ५५. सत्त्व ५७. शहाणा, चलाख ५९. घरोघर ६०. श्रीरामाचे स्तोत्र ६२. भितीवरून सरपटणारा प्राणी ६३. घर ६४. महिना ६५. समशेर, ढाल ---- ६७. चालू दिवस ६८. लहानसहान ७१. अभिनेता ७२. पंख ७३. वर्ण ७५. गाणे ७७. नोकरी करणारा ८०. जरीने भरलेले वस्त्र ८१. मांडणी, सजावट ८२. भीतीने होणारी थरथर ८३. पुष्पराग, सत्त्व, तमबरोबरचा तिसरा गुण

उभे शब्द

१. मावळ्यांची युद्धातील प्रोत्साहनपर घोषणा २. दिवस ३. जावई (हिंदी) ४. दारूचा एक प्रकार ५. यावर्षी (ग्रा.) ७. तीन दिवसाचे फूल ८. अवधान, लक्ष ९. भारताचे पहिले पंतप्रधान १२. चटकन १३. धट्टाकट्टी १४. धोबी १७. जास्तीत जास्त व कमीत कमी २०. हिंदीत मोठा २१. मला, वरचा माळा २३. संध्याकाळ २४. एखाद्याच्या बाजूने बोलणे, वकिली करणे २६. त्याप्रमाणे २९. मोठी नदी ३१. डावखोरा ३३. चित्तथरारक ३५. स्वत:ला ३७. मृत्यू ३९. रावण ४१. राजवाडा ४३. जल ४४. शरीर ४५. धमनी ४६. हाताचा तळवा ४७. लग्नसोहळा ४८. आशीर्वाद ५१. पैगंबर, राजा यांच्या नावापुढील बहुमानाचा शब्द ५२. पूर्ण भेदून जाणे ५४. नाशिकजवळून वाहणारी नदी ५६. मध्यम प्रमाण ५८. मुलगा, तनय ६१. धुणे ६४. मत्स्य ६६. मार्गक्रमण ६७. नौदल ६८. भाकरीचे एक धान्य ६९. खबदाड ७०. चषक ७२. अन्य, दुसरा ७४. मगज ७६. पान, पाकळी, तुकडी ७८. रचलेले कारस्थान ७९. निद्रा, झोप



### शब्दकोडे क्र. 09 चे उत्तर

आडवे उत्तर

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

उभे उत्तर

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ

# जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील 'ऑन फिल्ड' : वडनेर-मलकापूर रोडवर अवैध बायोडिझेलवर छापा

## २९०३० किलो अवैध बायोडिझेल जप्त

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा प्रशासनाकडून आज (दि.१५) जिल्ह्यात अवैध बायोडिझेल व्यवहारावर मोठी धडक कारवाई करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वडनेरमलकापूर रोडवर संशयितरित्या उभा असलेल्या टँकरवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १२ लाख ३३ हजार १९४ रुपये किमतीचे २९०३० किलो अवैध बायोडिझेल जप्त करण्यात आले असून संबंधित ट्रक ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

उपलब्ध माहितीनुसार, वडनेरमलकापूर रोडवर उभा असलेला टँकर क्रमांक GJ03BW3034 संशयितरित्या आढळून आला होता. या टँकरचा चालक सहदेवने उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे त्यावर संशय बळावल्याने टँकरवर छापा टाकण्यात आला. हे बेकायदेशीर बायोडिझेल हॉनेस्ट कॉर्पोरेशन, पणोली, अंकलेश्वर, जिल्हा भरूच (गुजरात) येथून बापा सीताराम ट्रेडिंग, वाघुड, ता. मलकापूर, जि. बुलढाणा येथे पाठविण्यात येत होते. गोपनीय माहितीच्या आधारावर जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.

या प्रकरणात संबंधितांविरूद्ध एफआयआर दाखल करण्याची कार्यवाही तहसीलदार राहुल तायडे, पुरवठा निरीक्षक धनश्री हरणे यांनी केली असून गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही सुरु आहे. अवैध बायोडिझेल विक्री, वाहतूक व साठा प्रकरणी पुढील तपास जिल्हा प्रशासन व पोलिस निरीक्षक गणेश गिरी करत आहेत.

जिल्ह्यात बेकायदेशीर बायोडिझेल व्यवहार कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. यात गुंतलेल्या व्यक्तींवर



कठोर कारवाई केली जाईल. तसेच अवैध बायोडिझेल आढळल्यास त्याबाबत नागरिकांनी प्रशासनाला माहिती द्यावी,'' असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

## महाराष्ट्रातील खासगी प्रसूती रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाचा 'लक्ष्य-मान्यता' उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील खासगी प्रसूती रुग्णालयांमध्ये सेवा गुणवत्ता वाढवून प्रसुतीदरम्यान होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष्य-मान्यता (LaQshya-Certification) हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

हा उपक्रम राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांमध्ये दर्जात्मक, सुरक्षित आणि आदरयुक्त प्रसूती सेवा (Respectful Maternity Care) सुनिश्रि्चत करण्यासाठी राबविण्यात येत आहे. महाराष्ट्राने मागील काही वर्षांत मातामृत्यू कमी करण्यामध्ये उल्लेखनीय प्रगती केली असून, आता हा प्रयत्न खासगी क्षेत्रापर्यंत विस्तारित करण्यात आला आहे.

लक्ष्य-मान्यता कार्यक्रमाचा मुख्य हेतू प्रसूतीदरम्यान माता आणि नवजात बालकांचे मृत्यूदर कमी करणे, खासगी रुग्णालयांमधील सेवा गुणवत्ता, रुग्ण सुरक्षा आणि रुग्ण काळजीत सुधारणा करणे, प्रत्येक महिलेला सुरक्षित व आदरयुक्त प्रसूती अनुभव मिळवून देणे आहे.

हा उपक्रम महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग, फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॉकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया (FOGSI) आणि गहळिशसे या आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

गहळिशसे संस्थेमार्फत फॉग्सी आणि खासगी रुग्णालयांना आवश्यक तांत्रिक सहाय्य, प्रशिक्षण आणि मूल्यांकन सहाय्य पुरविले जाणार आहे.

## भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आज (दि.१५) जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, तहसीलदार विजय सवडे, नायब तहसीलदार संजय बंगाळे, प्रशांत रिंढे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर आदी अधिकारी व कर्मचारी यांनी फुलपुष्प अर्पण करुन भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन केले.

## भाजपची वाट न पाहता पूर्व विदर्भात शिवसेना स्वबळाच्या तयारीत

**दैनिक आपला विदर्भ**

**५६ नगरपंचायत, नगरपरिषदेसाठी तेराशे एबी फार्मचं वाटप!**

**मुंबई/प्रतिनिधी :** पूर्व विदर्भातील ५६ नगरपंचायत, नगरपरिषदच्या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने १३०० एबीफार्म दिले आहे. त्यामुळे भाजपची वाट न पाहता शिवसेना विदर्भात स्वबळाच्या तयारीत असल्याचे दिसत आहे. शिवसेनेचे आमदार कृपाल तुमाने यांनी याची तशी पुष्टी देखील केली आहे. महायुतीच्या घटक पक्षांसोबत आघाडी व्हावी, हा आमचा प्रयत्न शेवटपर्यंत राहणार आहे. मात्र युती झाली नाही तर आम्ही सर्वच जागी उमेदवार उतरवू, असे कृपाल तुमाने म्हणाले. त्यामुळे नागपूरसह पूर्व विदर्भात आता महायुतीत ऑल इज वेल नाही का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

दरम्यान, येत्या १४ तारखेपर्यंत भाजपने स्थिती स्पष्ट करावी, अन्यथा महायुतीच्या स्वरूपात आम्ही भाजप वगळून तयारी करू, असे गंभीर राजकीय संकेत शिवसेनेच्या नेत्यांनी दिले होते. मात्र अद्याप परिस्थिती जैसे थेच आहे. परिणामी, नागपुरात मोठा भाऊ असलेल्या भाजपच्या भूमिकेमुळे महायुतीतील छोटे पक्ष भाजप वगळून वेगळी महायुती करण्याच्या तयारीत आहेत का?? असा प्रश्न निर्माण झाला आहे. शिवसेनेच्या पुढाकाराने नुकतेच नागपूरात महायुतीच्या भाजप वगळून उर्वरित पक्षांची म्हणजेच शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) बहुजन रिपब्लिकन एकता मंच आणि पीपल्स रिपब्लिकन पार्टी ची बैठक संपन्न झाली.

आम्हा सर्वच पक्षांना महायुती करायची आहे. मात्र भाजपने वेळीच आपले पत्ते खुले केले नाही, तर आमचीही तयारी झाली आहे. नागपूर जिल्ह्यातील सर्व १५ नगरपरिषद आणि १२ नगरपंचायतीमध्ये आमचे उमेदवार आणि त्यांचे बी फार्म तयार असल्याचा इशारा शिवसेनेने दिला होता. त्यामुळे आता भाजपची वाट न पाहता पूर्व विदर्भात शिवसेनेला स्वबळाची तयारीत असल्याच्या शक्यतेला अधिक बळ प्राप्त झाले आहे. राज्यात शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत सत्तेत सहभागी असलेल्या भाजपनं भंडाऱ्यात नगरपालिका निवडणुकीसाठी एक ला चलो रे ची भूमिका ठरवली आहे. भाजपानं भंडारा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून मधुरा मदनकर यांना घोषित केलय. मात्र, अन्य कुठल्याही उमेदवारांची घोषणा झालेली नाही. किंबहुना सर्व नावं भाजपनं गुलदस्त्यात ठेवलेलं असताना दुसरीकडे मात्र, भाजपनं त्यांचा प्रचार धडाक्यात प्रचार सुरू केलाय.

भाजपचे निवडणूक प्रचार प्रमुख म्हणून आमदार परिणय फुके यांच्यावर जबाबदारी असून त्यांनी डोअर टू डोअर प्रचार मोहीम सुरू केली आहे. भाजपाच्या एकाही उमेदवाराचं नामांकन दाखल झालेलं नसताना त्यांनी सुरू केलेल्या प्रचाराच्या धडक मोहिमेला भंडारा शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचं बघायला मिळत आहे.

# वाशीम नगरपरिषद निवडणुकीत भाजपाचा मोठा मास्टरस्ट्रोक! महाविकास आघाडीला पाडले खिंडार

## माजी नगराध्यक्ष, नगरसेवक यांच्यासह डझनभर कार्यकर्त्यांचा भाजपात जाहीर प्रवेश

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशिम/प्रतिनिधी :** वाशीम नगरपरिषद निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्यास अवघे दोन दिवस उरले असताना भारतीय जनता पक्षाने महाविकास आघाडीला मोठा धक्का देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या तब्बल १५ ते २० माजी नगरसेवक व माजी नगराध्यक्षांचा भव्य पक्षप्रवेश करून घेतला आहे. या अचानक घडलेल्या राजकीय हालचालीमुळे शहरातील निवडणूक



समीकरणच बदलले असून भाजपाचे पारडे अधिक मजबूत झाल्याची चर्चा वाशीमच्या राजकीय वर्तुळात होत आहे.

वाशीमच्या विठ्ठलवाडी सभागृहात झालेल्या या मोठ्या पक्षप्रवेश सोहळ्यात खासदार अनुप धोत्रे, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे आणि आमदार श्याम खोडे यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीतील महत्वाचे नेते मोठ्या संख्येने भाजपात दाखल झाले. या प्रवेश घेणाऱ्यांमध्ये माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले, माजी नगरउपाध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, काँग्रेसचे शहराध्यक्ष शंकर वानखेडे, माजी नगरसेवक ॲड. विनोद खंडेलवाल, अतुल वाटाणे यांच्यासह डझनभर कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासदृष्टीवर विश्वास ठेवून भाजपात प्रवेश केल्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी सांगितले. त्यांनी पुढे बोलताना आगामी नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष हा भाजपाचाच असेल, असा विश्वास व्यक्त केला. या प्रवेशामुळे महाविकास आघाडीच्या गोटात मोठी खळबळ उडाली असून वाशीमच्या राजकारणात भाजपाने निर्णायक आघाडी घेतल्याचे स्पष्ट दिसत आहे.

## वृत्तविशेष...

### निवडणूक निरिक्षक शंकर कुंभार यांची बुलढाणा नगरपरिषदेला भेट






**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने शनिवारी (दि.१५) रोजी निवडणूक निरिक्षक शंकर कुंभार यांनी बुलढाणा नगरपरिषदेला भेट दिली.यावेळी त्यांनी नामनिर्देशन, प्रभाग रचनेबाबतची माहिती घेतली. तसेच सुरक्षा कक्ष (स्ट्रांग रुम), मतदान केंद्राची माहिती घेत मतदान केंद्राना भेट दिली. निवडणुकीसंबंधी सुरु असलेल्या कामाकाजाबाबत समाधान व्यक्त केले.यावेळी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्माण अधिकारी शरद पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी आदी कर्मचारी उपस्थित होते.

### निकुंबे गावात गायत्री पाटील यांच्यासह दोन चिमुकल्यांचे विहिरीत मिळून आले मृतदेह



**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे तालुक्यातील निकुंभे शिवारात दुपारी दीड ते दोनच्या सुमारास गायत्री आनंदा वाघ-पाटील (वय २७ वर्षे) यांनी आपल्या मुलगा दुर्गेश (वय ६ वर्षे) आणि मुलगी दुर्वा (वय ३ वर्षे) यांच्यासह गाव शिवारातील गोशाळेकडील विहिरीत उडी घेतली. कौटुंबिक वादांमुळे नैराश्यातून हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक प्राप्त होत आहे.

विहिरीत ३० ते ४० फूट खोल पाणी असल्याने घटनेची लगेच कोणालाही कल्पना आली नाही. सायंकाळी तिघांचा शोध सुरू झाल्यावर जवळपास संशय निर्माण झाला आणि अखेर विहिरीत तिघांचे मृतदेह आढळून आले. घटनास्थळी पोलिसांचे पथक दाखल झाल्यावर तपासाची दिशा स्पष्ट झाली. मृतदेह बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी धुळे जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. सोनगीर पोलीस ठाण्यात या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. गावात या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

### महायुतीत संघर्ष वाढला, उल्हासनगरात भाजपला मोठं खिंडार, ८ नगरसेवक शिंदे गटात

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी केली जात आहे. विरोधी पक्षाचे महत्त्वाचे नेते पदाधिकारी फोडून स्वत:च्या पक्षाची ताकद वाढवली जात आहे. आता महायुतीतच संघर्ष वाढला आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाकडून एकमेकांचे नेते-पदाधिकारी फोडण्याचं काम सुरू आहे. काही दिवसांपूर्वी भाजपने पालघरमध्ये शिंदे गटाला धक्का दिला होता. काही महिला नेत्यांचा पक्षप्रवेश घडवून आणला होता. ही घटना ताजी असताना आता शिवसेना शिंदे गटाकडून भाजपला मोठं खिंडार पाडलं आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर उल्हासनगरमध्ये भाजपच्या दोन माजी जिल्हाध्यक्षांसह आठ माजी नगरसेवकांना शिंदे गटानं आपल्या पक्षात प्रवेश दिला आहे.

### चाहत्यांना महेश बाबू-राजामौली देणार मोठे सरप्राईज..

**मुंबई/प्रतिनिधी :** 'द ग्रँड ग्लोब ट्रॉटर' हा सर्वात मोठा कार्यक्रम आता चाहत्यांना काही तासात पाहायला मिळणार आहे. सध्या प्रत्येकजण आतुरतेनं हा कार्यक्रम पाहण्याची वाट पाहत आहे. आज, १५ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाचे नेतृत्व दिग्दर्शक एस.एस. राजामौली करणार आहेत. या चित्रपटामध्ये पृथ्वीराज सुकुमारन खलनायक कुंभाच्या भूमिकेत दिसणार आहे. याशिवाय या चित्रपटात प्रियांका चोप्रा मंदाकिनीच्या भूमिकेत दिसेल. तिचं हे लूक नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. तिच्या लूकमुळं या चित्रपटासाठी लोकांचा उत्साह आणखी वाढताना दिसत आहे. प्रियांकाची एक झलक समोर आल्यानंतर तिला पुन्हा भारतीय चित्रपटामध्ये पाहण्यासाठी चाहते खूप आतुर आहेत. दरम्यान 'द ग्रँड ग्लोब ट्रॉटर' या कार्यक्रमाचा आणखी उत्साह वाढविण्यासाठी निर्मात्यांनी एक बीटीएस व्हिडिओ शेअर केला आहे.